## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. ३०९/२०२०/अहमदनगर**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. पवार भरत बाबुराव श्री. स्वामी समर्थ प्रोव्हीजनच्या पाठीमागे, गणेश नगर, दर्गा रोड, परभणी, ता.जि.परभणी-४३१४०१ | सहायक प्रशासन अधिकारी (आस्थापना), जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जुन्या पंपिंग स्टेशनसमोर, भुतकरवाडी, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जुन्या पंपिंग स्टेशनसमोर, भुतकरवाडी, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर. |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**व्दितीय अपिल सुनावणी दिनांक – २२/०९/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ३१/१०/२०१९ | ३१/१०/२०१९ | २४/१२/२०१९ | ०९/१२/२०१९ | ०९/१२/२०१९ | --- |

अपिलार्थी यांनी दि. १४/०१/२०२० रोजीच्या अर्जान्वये "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केली नाही.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित असुन अन्य सर्व पक्षकार उपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"आपल्या अधिनिस्त कार्यालयातील दि.०१/०२/१९९४ ते दि.३१/०८/२००४ पर्यंत शासकीय पदावर कार्यरत असतांना दिवंगत झालेल्या वर्ग (ब) अधिकारी यांच्या जागेवर अनुकंपातत्वावर वर्ग ४ या पदावर नियुक्त करण्यासाठी शैक्षणिक अर्हता शिथील करण्यासाठी आपल्या स्तरावरुन वरीष्ठ कार्यालयात शासनास

पाठविलेल्या प्रस्तावाची व त्यावर शासन स्तरावर झालेल्या कार्यवाहीची छायांकित प्रत. शैक्षणिक अर्हता शिथील झालेल्या कार्यवाहीची छायांकित वर्षनिहाय यादी"

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र "ब" मध्ये " माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी (आस्थापना), जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी अपिलार्थी यांच्या दि. ३१/१०/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २४/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उपलब्ध माहिती पुरविण्यात आली आहे असे दिसुन येते.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी दि. ०९/१२/२०१९ रोजी दाखल केलेल्या अपिलावर कोणतीही सुनावणी घेण्यात आली नसुन आदेश पारीत करण्यात आलेला नाही असे दिसुन येते.

३) सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अपिलार्थी यांनी दि.३१/१०/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २४/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उपलब्ध माहिती पुरविण्यात आली. त्याचप्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही असे अभिलेखावरुन दिसुन येते.

४) सुनावणीदरम्यानचे युक्तिवाद आणि उपलब्ध अभिलेख विचारात घेता असे स्पष्ट होते की, अपिलार्थींनी दि. ३१/१०/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अनुषंगाने दि.२४/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उपलब्ध माहिती पुरविण्यात आली आहे. त्याचप्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही असे स्पष्ट होत आहे. तसेच अपिलार्थीच्या व्दितीय अपिलात म्हणण्यानुसार माहिती अद्यापही अप्राप्त आहे असे निदर्शनास येत आहे.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी (आस्थापना), जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र

"अ" मध्ये मागणी केलेली सदर माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन दयावी. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत.

२) विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आदेश पारीत न केल्यामुळे अधिनियमातील कलम १९ (६) आणि सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदींचा भंग केला असल्याची खातरजमा झाल्यास त्यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक.३०९/२०२०/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत:- माहितीसाठी आणि आवश्यक कार्यवाहीसाठी विभागीय कृषि सहसंचालक, नाशिकरोड, नाशिक

जावक क्र. अपि-११५६ 28 MAY 2024